# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापुर.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, कोल्हापुर – ४१६००४,

फोन नं : ०२३१- २५२१०३८ , फॅक्स : ०२३१- २५२१०१६. ईमेल - gpkolhapur@yahoo.com


**जा.क्र.शातंनिको/ग्रंथालय विभाग/२०२४/3846** दिनांक :- 31 DEC 2024

प्रति,

-------------------

------------------

**विषय – पुस्तकाचे खरेदी दरपत्रक पाठविणे बाबत...**

महोदय,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालया,कोल्हापूर संस्थेसाठी ग्रंथालय विभागाकरीता पुस्तकाची खरेदी करण्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे. तरी आपले डिस्काउंटचे दर सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे भरुन संस्थेत दिनांक १५/०१/२०२५ सायंकाळी ०५.०० वाजेपर्यत पाठविण्यात यावे. प्राप्त झालेली दरपत्रके शक्य झालेस दिनांक १६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. प्राचार्य यांच्या कक्षात उघडण्यात येतील.

**अटी व शर्ती खालीलप्रमाणे -**

१) प्रकाशकांची यादी सोबत जोडलेली आहे. नमुद केलेल्या प्रकाशकानुसार सवलतीचे दर दरपत्रकात नमुद करण्यात यावे.
२) सदरची पुस्तके या संस्थेमधील ग्रंथालय विभागामध्ये पोहोच करणेसहीत दर देण्यात यावेत.
३) सदर पुस्तकाचे माहितीपत्रक (उपलब्ध असलयास) दरपत्रकासोबत जोडण्यात यावे.
४) सदर पुस्तकाचे दर हे दरपत्रक उघडण्यात आलेल्या दिनांकापासून सहा महीने पर्यंत वैध असावेत.
५) सदर पुस्तकांच्या नग व संख्येत आवश्यकतेनुसार बदल केले जाऊ शकतात.
६) दरपत्रकावर लागू असल्यास GST क्रमांकाचा उल्लेख करावा.
७) दरपत्रके सिलबंद लिफाफयामधूनच पाठवावे. त्यावर वरीलप्रमाणे जावक क्र. दिनांक व **"ग्रंथालय शासकीय अभियांत्रिकी ,महाविद्यालय कोल्हापूर"** करिता दरपत्रके असा उल्लेख लिहावा.
८) ई-मेल व्दारे पाठविण्यात आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार करण्यात येणार नाही.
९) एक किंवा सर्व दरपत्रके अंशतः अथवा पूर्णतः स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क निम्मस्वाक्षरीकार यांनी राखून ठेवला आहे.
१०) सदर पुस्तकाचे दरपत्रक मंजूर झाल्यानंतरच प्रकाशकानुसार पुरवठा आदेश देण्यात येईल. तसेच आपण आदेश मिळाल्यानंतर ३० दिवसाच्या आत पुस्तके संस्थेत पुरवठा करायाचे बंधन राहील. त्यानंतर पुस्तके पुरवठा केल्यास खाली सही करणा-यांचा निर्णय अंतिम राहील तसेच आपले राष्ट्रीयकृत बॅकेमध्ये खाते असणे आवश्यक आहे.
११) परदेशी चलनाचे दर **Good Office Committee** चे मार्गदर्शनाप्रमाणे देण्यात येईल.
१२) आपण देयकासोबत सादर केलेला PAN चालू स्थितीत नसेल व भविष्यात त्या संबंधी आयकर विभागाकडून दंड या संस्थेस आकारण्यात आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.
१३) दरपत्रकाबाबत काही कायदेशीर अडचणी आल्यास कोल्हापूर कार्यकक्षात याची अमलबजावणी केली जाईल.
१४) ज्या पुरवठादारांचा डिस्काउंटचा दर जास्त प्रकाशनाकरीता येईल, त्यांना उर्वरीत प्रकाशनाकरीता पुस्तकांचा पुरवठा करण्याकरीता अन्य पुरवठादारांचा आलेला ज्यादाचा डिस्काउंट नुसार चर्चेव्दारे आदेश देण्यात येतील.
१५) वार्षिक रुपये १५ लाखची उलाढाल असलेले सी.ए.चे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.
१६) किमान तीन शैक्षणीक संस्थाना मागील दोन वर्षात (२०२२-२३,२०२३-२४)पुस्तकांचा पुरवठा केल्याची प्रत सोबत जोडणे आवश्यक आहे.

31/12

**(कॅप्टन डॉ. नितीन पा. सोनजे)**
**प्राचार्य**
**शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर**

**सोबत - प्रकाशकांची यादी**

प्रत- १) **शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,कोल्हापूर** नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर.
२) **शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर** नोटीस बोर्ड व संकेतस्थळावर.
३) मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महा. कोल्हापूर

| SR.NO | Name of Publisher | Discount % |
|---|---|---|
| 1 | Elsevier Publisher | |
| 2 | Tata Mc-Grow Hill | |
| 3 | Pearson Education | |
| 4 | Prentice hall of India, New Delhi | |
| 5 | Central Publishing Home Allahabad | |
| 6 | Khanna Publication | |
| 7 | Chapman | |
| 8 | Wiley | |
| 9 | Cambridge University | |
| 10 | MIT Press | |
| 11 | Shri Lakshmi Publication | |
| 12 | SAE International Pub. | |
| 13 | S Chand Pub. | |
| 14 | Dreamtech | |
| 15 | CRC Press | |
| 16 | Springer | |
| 17 | Dhanpat Rai & co. | |
| 18 | New Age international | |
| A | Other than above National Publication | |
| B | Other than above International Publication | |

| Name of the Vender | Address of the Vender |
|---|---|
| | |

Kolhapur Government Polytechnic Library